## अलिबाग नगरपरिषद, जिल्हा रायगड

### सूचना

क्रमांक ४८४/२०१२

ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेली जनहित याचिका क्रमांक (१) २०५३/२००३, (२) ७६/२००७, (३) ८५/२००७, (४) १/२००९ मधील दिनांक २६ फेब्रुवारी २००९ आदेशान्वये महाराष्ट्र शासन व इतर विभागांनी ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम, २००० ची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता ठराविक निदेश दिलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक ध्वनीप्र/२००९/प्र.क्र. ९५/तांक-१, दिनांक २१ एप्रिल २००९ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांनी शहरी भागात शांतता झोन जाहीर करणे आवश्यक आहे, असे कळविले आहे ;

ज्याअर्थी, मा. प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन तथा विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडील पत्र जा. क्र. साशा/कार्या-४/नपा-७/२७२४/शांतता झोन/२०१०, दिनांक १६ नोव्हेंबर २०१० अन्वये सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम, २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शांतता झोन त्वरित घोषित करून शांतता झोनचे फलक लावून प्रसिध्दी करणेबाबतची कार्यवाही करणेस कळविण्यात आलेले आहे ;

ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडील पत्र क्रमांक नपाप्र/कार्या-१/शांतता क्षेत्र/२०११, दिनांक ३० मार्च २०११ नुसार नगरपरिषद हद्दीमध्ये शांतता क्षेत्र घोषित करण्याबाबत सूचना केलेल्या आहेत ;

ज्याअर्थी, वरील नमूद केलेल्या आदेशास अधिन राहून अलिबाग नगरपरिषदेने ठराव क्रमांक ६४६, दिनांक ६ ऑगस्ट २०११ अन्वये नगरपरिषद हद्दीतील खालीलप्रमाणे शांतता क्षेत्र घोषित करणेचा निर्णय घेतलेला आहे :—

(१) चेंढरे येथील नगरपरिषदेची मराठी शाळा

(२) आंग्रे समाधीजवळील नगरपरिषदेची मराठी शाळा

(३) को.ए.सो. जा.र.ह. कन्या शाळा

(४) को.ए.सो. जन. अरुणकुमार वैद्य हायस्कूल

(५) जे.एस.एम. कॉलेज

(६) शासकीय रुग्णालय

(७) जिल्हा न्यायालय.

त्याअर्थी, वरीलप्रमाणे घोषित केलेल्या शांतता क्षेत्राच्या आवारात १०० मीटरचे परिसरात कोणत्याही प्रकारचे ध्वनी प्रदूषण करण्यात येऊ नये असे अलिबाग नगरपरिषदेतर्फे आवाहन करण्यात येत आहे. या शांतता क्षेत्राची अंमलबजावणी ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झालेचे दिनांकापासून अंमलात येईल.

कल्पिता कि. पिंपळे,
मुख्याधिकारी,
अलिबाग नगरपरिषद.

नमिता प्र. नाईक,
अध्यक्षा,
अलिबाग नगरपरिषद.

अलिबाग,
दिनांक १६ फेब्रुवारी २०१२.